# BOMBAY ACT No. XXXIII OF 1958.

## AN ACT TO EXTEND THE INDIAN TREASURE-TROVE ACT, 1878, TO THE HYDERABAD AND SAURASHTRA AREAS OF THE STATE OF BOMBAY.

## सन १९५८ चा मुंबई अधिनियम ३३ वा.

[राष्ट्रपति यांची संमति मिळाल्यानंतर "मुंबई राजपत्रांत" तारीख १० एप्रिल १९५८ रोजीं प्रथम (इंग्रजींत) प्रसिद्ध केलेला.]

## मुंबई राज्याच्या हैदराबाद व सौराष्ट्र विभागास भारतीय निधिनिक्षेप (गुप्तधन) अधिनियम, १८७८ लागू करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, भारतीय निधिनिक्षेप अधिनियम, १८७८ हा जे प्रदेश तारीख १ नोव्हेंबर १९५६ च्या लगतपूर्वी भाग ब राज्यांत होते त्या प्रदेशांव्यतिरिक्त सबंध भारतास लागू होतो ;

आणि ज्याअर्थी, मुंबई राज्याच्या हैदराबाद विभागांत हैदराबाद निधिनिक्षेप अधिनियम, १३२२ फसली हा अंमलांत आहे, आणि मुंबई राज्याच्या सौराष्ट्र विभागांत सौराष्ट्र राज्य (केंद्रीय व मुंबई अधिनियम लागू करण्याबाबत) अध्यादेश, १९४८ याद्वारें सुधारलेला व लागू केलेला भारतीय निधिनिक्षप अधिनियम, १८७८, अंमलांत आहे ;

आणि ज्याअर्थी, मुंबई राज्याच्या उरलेल्या भागांत अंमलांत असलेला भारतीय निधिनिक्षेप अधिनियम, १८७८ हा त्या राज्याच्या हैदराबाद व सौराष्ट्र विभागांसदेखील लागू करणें व त्यांत अंमलांत आणणें व त्यामुळें उपरोक्त तत्सम उपबंध रद्द करणें इष्ट आहे ;

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या आठव्या वर्षी याव्दारें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे :—

१. (१) या अधिनियमास भारतीय निधिनिक्षेप (मुंबई राज्याच्या हैदराबाद व सौराष्ट्र विभागांस लागू करण्याबाबत) अधिनियम, १९५७ असें म्हणावें. *लघु संज्ञा प्रारंभ.*

(२) तो तावडतोब अंमलांत येईल.

२. भारतीय निधिनिक्षेप अधिनियम, १८७८ (ज्याचा यांत पुढें मुख्य अधिनियम असा उल्लेख करण्यांत आला आहे) हा याद्वारें मुंबई राज्याच्या हैदराबाद व सौराष्ट्र विभागांस लागू करण्यांत येत आहे. *सन १८७८ चा अधिनियम ६ वा मुंबई राज्याच्या हैदराबाद व सौराष्ट्र विभागांस लागू करणें.*

सन १८७८चा अधिनियम ६वा या मध्यें आनुषंगिक सुधारणा.

३. मुख्य अधिनियमांत—

(१) कलम १ मध्यें,—

(१) दुसऱ्या परिच्छेदांत पुढील परंतुक जादा दाखल करावें:—

"परंतु भारतीय निधिनिक्षेप (मुंबई राज्याच्या हैदराबाद व सौराष्ट्र विभागांस लागू करण्याबाबत) अधिनियम, १९५७ याच्या प्रारंभानंतर हा अधिनियम मुंबई राज्याच्या हैदराबाद व सौराष्ट्र विभागांसदेखील लागू होईल व त्या विभागांत अंमलांत असेल.";

(२) अशा रीतीनें दाखल केलेल्या परंतुकाच्या समासांत "विवक्षित विभागांत प्रारंभ" ही समासांतील टीप दाखल करावी;

(२) कलम २१ नंतर, पुढील कलम दाखल करावें:—

... व बचाव.

"२२. हैदराबाद निधिनिक्षेप अधिनियम, १३२२ फसली आणि सौराष्ट्र राज्य (केंद्रीय व मुंबई अधिनियम लागू करण्याबाबत) अध्यादेश, १९४८ याद्वारें सुधारलेला व लागू केलेला भारतीय निधिनिक्षेप अधिनियम, १८७८, हे याद्वारें रद्द करण्यांत येत आहेत:

परंतु, ते अधिनियम रद्द झाले असले तरी, अशा रीतीनें रद्द झालेल्या कोणत्याहि कायद्याच्या उपबंधावरून किंवा उपबंधान्वयें (दिलेली कोणतीहि नोटीस किंवा दिलेलें कोणतेंहि तारण, आणलेली कोणतीहि जप्ति, ठरविलेली कोणतीहि गोष्ट, लिहून दिलेलें प्रतिज्ञापत्र, स्वाधीन केलेली गोष्ट, केलेली विभागणी, संपादन केलेली गोष्ट किंवा दिलेला आदेश, संपादन केलेले सर्व हक्क, प्राप्त झालेलीं सर्व बंधनें व पत्करलेल्या जबाबदाऱ्या, लादलेला दंड आणि कलेक्टर, नियंत्रण करणारा मुख्य महसूल प्राधिकारी, तालुकदार, सुभेदार, महसूल मंडळ किंवा इतर प्राधिकारी यांजपुढें अनिर्णित राहिलेलें सर्व कामकाज व अपिलें आणि त्यासाठीं प्रदान केलेले सर्व अधिकार धरून) केलेली कोणतीहि गोष्ट किंवा केलेली उपाययोजना, हा अधिनियम जणूं त्यावेळीं अंमलांत असल्याप्रमाणें, या अधिनियमाच्या उपबंधान्वयें दिली आहे किंवा दिलें आहे, आणली आहे, ठरविली आहे, दिलें आहे, स्वाधीन केली आहे, केली आहे, संपादन केली आहे, दिला आहे, संपादन केले आहेत, प्राप्त झालीं आहेत, पत्करल्या आहेत, लादला आहे, अनिर्णित राहिलें आहे, प्रदान केले आहेत व केली आहे, असें समजलें पाहिजे; आणि उपरोक्त प्राधिकाऱ्यापुढें अनिर्णित राहिलेलें असें सर्व कामकाज व अपिलें त्याप्रमाणें, आवश्यक असेल तेथें, या अधिनियमान्वयें तत्सम प्राधिकाऱ्याकडे वर्ग झालेलीं आहेत असें समजलें पाहिजे, आणि जर असा कोणताहि प्राधिकारी नसेल किंवा तत्सम प्राधिकाऱ्यासंबंधीं शंका असेल तर राज्य सरकार नामोद्दिष्ट करील अशा प्राधिकाऱ्याकडे वर्ग झालेलीं आहेत असें समजलें पाहिजे, आणि या अधिनियमाच्या उपबंधानुसार तीं अशा प्राधिकाऱ्यापुढें चालू ठेवलीं पाहिजेत व निकालांत काढलीं पाहिजेत."

(True translation)

Y. H. PITKE,

Examiner of Books and Publications, Bombay.